# प्रकरण दोन

## मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन


२.१ प्रस्तावना

२.२ मराठी भाषेचे महत्व

२.३ मराठीच्या अध्ययन अध्यापनाची उद्दिष्टे

२.३.अ प्रथम स्तरावरील मराठी भाषेच्या अध्ययन अध्यापनाची उद्दिष्टे

२.३.ब द्वितीय स्तरावरील मराठीच्या अध्ययन अध्यापनाची उद्दिष्टे

२.४ मराठी भाषेचा अध्यापक

२.५ मराठी विषयाच्या अध्यापनपध्दती

२.६ मराठी विषयासाठी अभ्यासपूरक उपक्रम

२.७ समारोप

संदर्भ सूची

## प्रकरण दोन

## मराठी भाषेचे अध्ययन-अध्यापन

### २.१] प्रस्तावना :-

मागील प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधनाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे, महत्व, व्याप्ती, मर्यादा आणि संशोधन पध्दती या गोष्टींचा विचार केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात संशोधनास आवश्यक असलेली सैध्दांतिक पार्श्वभूमी विशद करणे हा हेतू आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावरील मराठीचे अध्ययन-अध्यापन हा संशोधनाचा प्रतिपाद्य विषय असल्यामुळे सहाजिकच मराठी भाषेचे महत्व, ती शिकविण्याची उद्दिष्टे, ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या अध्यापन पध्दती, अभ्यासपूरक उपक्रम या गोष्टींचा ऊहापोह करणे आवश्यक ठरते.

### २.२] मराठी भाषेचे महत्व :-

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. तसेच त्या राज्यात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांची मातृभाषा आहे. मातृभाषेच्या सामर्थ्यावर कोणत्याही विषयाच्या अभ्यासासाठी आवश्यक असलेली आकलनशक्ती व कौशल्ये यांचा विकास होण्यास मदत होते. साध्या श्रवण-भाषण कौशल्यापासून ते प्रतिभासंपन्न सृजनशीलतेपर्यन्त प्रत्येक क्रियेत मातृभाषेची आवश्यकता आहे.

"मराठी मातृभाषा म्हणून जशी विचारांची जनक व वाहक आहे तशीच ती भावनिक विकासाचे आणि ज्ञानप्राप्तीचे, आत्मप्रगटीकरणाचे आणि संस्कृतिसंवर्धनाचे साधन आहे आणि म्हणूनच मराठी मातृभाषा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे सुयोग्य माध्यम आहे."[१]

विद्यार्थ्यांत कांही मूल्ये व निष्ठा संक्रमण करण्याचे कार्य शिक्षणाला करावे लागते. या निष्ठा निर्माण करण्याचे साधन म्हणजे विद्यार्थ्यांना

मानवी संस्कृतीचा वारसा प्राप्त करून देणे होय. मानवी समाजाचे म्हणून काही आचार, विचार, कल्पना, धर्मभावना, तत्वज्ञान, कला, वाङ्‌मय, जीवनमूल्ये या गोष्टी आहेत. या सर्व गोष्टींचा समावेश आपण संस्कृतीत करतो. संस्कृतीचा हा वारसा पुढच्या पिढीला भाषेच्या माध्यमातूनच मिळतो. वंशपरत्वे मिळणारे गुण जसे आपल्याला आई-वडिलांकडून मिळतात तसा महाराष्ट्रीय समाजाचा सांस्कृतिक वारसा मराठी भाषेतूनच मिळणार आहे. नव्या पिढीला हा सांस्कृतिक वारसा मिळाला नाही तर ती पिढी मराठी संस्कृतीला पारखी होईल.

नवी पिढी जीवन जगत असताना निरनिराळे अनुभव घेते. नवे ज्ञान निर्माण करते त्याची भर आधीच्या संस्कृतीत टाकून संस्कृतीचे संवर्धन करते. यासाठी आपल्या पूर्वजांचे व आपल्या संस्कृतीचे सम्यक दर्शन व्हावे म्हणून मातृभाषा मराठीचा अभ्यास अत्यंत आवश्यक आहे.

मानवाच्या आत्मप्रगटीकरणाच्या धडपडीतून भाषा निर्माण झाली. भाषेच्या मदतीनेच मनुष्य आपले विचार, आपल्या भावना, इच्छा, आकांक्षा, सुखदु:खे यथार्थपणे व्यक्त करू शकतो, व दुसऱ्यांची सुख:दुखे समजून घेऊ शकतो. असे आत्मप्रगटीकरण दोन प्रकारे होते ते म्हणजे तोंडी आणि लेखी.

माणसाला जशा जन्मजात सहजप्रवृत्ती असतात तशाच त्याला भावनाही असतात. मुलांचा भावनाविकास प्रामुख्याने मातृभाषेतूनच होत असतो. भावनिक विकासावर चारित्र्यघडण व शीलसंवर्धन अवलंबून असते. असे संस्कार करण्याचे सामर्थ्य भाषेमध्ये आहे.

मराठी महाराष्ट्रातील व्यवहाराचे प्रभावी साधन आहे. समाजातील निरनिराळ्या व्यक्तींना एकत्र आणण्याचे व त्यांच्यात विचारविनिमय घडवून आणणारे व नवचैतन्य निर्माण करण्याचे भाषा हेच एक प्रमुख साधन वा माध्यम आहे.

आपण भाषेचा उपयोग जसा अनेक कामासाठी करतो तसाच तो प्रशासनाच्या कामासाठीही करतो. सामान्यत: राज्यकारभारासाठी

वापरण्यात येणारी भाषा ही व्यवहाराच्या भाषेहून वेगळी नसावी. राज्यकारभाराची भाषा सर्वसामान्य माणसांची भाषा असल्याखेरीज त्यांच्या अभिव्यक्तीचे दर्शनच घडणार नाही.

एकंदरीत मानवी जीवनात भाषेला अनन्यसाधारण महत्व आहे. भाषा हा एक वारसा आहे, वरदान आहे. आत्मप्रगटीकरण, आत्मचिंतन, विचारांची देवाणघेवाण, संस्कृतीची जोपासना, समाजातील आर्थिक, राजकीय व्यवहार व्यक्तिमत्वाचा विकास या सर्व गोष्टींसाठी भाषेची आवश्यकता आहे. म्हणूनच श्री. ग. वि. अकोलकर म्हणतात, "व्यक्तित्वाच्या वेलीवर उमलणा-या सुंदर सुमनांना भाषा हाच जीवनरस आहे."[२] भाषा हा समाजाचा प्राण आहे. मातृभाषा हा सा-या शिक्षणाचाच नव्हे तर सा-या जीवनाचाच पाया आहे.

महाराष्ट्र हा मराठी भाषी प्रांत आहे. मराठी विद्यार्थ्यांना मराठी मातृभाषा म्हणून शिकविली जाते. भाषावार प्रांतरचना झाल्यापासून प्रत्येक राज्यात त्या त्या प्रदेशाची भाषा ही राज्यभाषा झाली आहे. त्या प्रदेशात ती भाषा बोलणारे विद्यार्थी मातृभाषा म्हणूनच तिचा अभ्यास करतात. परंतु प्रत्येक प्रदेशात जे अन्यभाषी लोक राहत आहेत त्यांनीही प्रादेशिक भाषा शिकावयाला हवी हे सर्वमान्य झाले आहे. उद्देश हाच की प्रादेशिक भाषेच्या माध्यमातून त्या लोकांनी प्रादेशिक लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करावेत व जीवनाशी एकसमता साधावी, व्यावहारिक जीवनातही तिची उपयुक्तता वाढावी यादृष्टीने अभ्यासक्रमात अन्य भाषिकांसाठी, इंग्रजी माध्यम घेऊन शिकणा-यांसाठी प्रादेशिक भाषेचा अंतर्भाव करण्यात आला. महाराष्ट्रातही अ-मराठी लोकांचे प्रमाण बरेच आहे. त्यांनीही मराठी भाषा शिकावी अशी शासनाची अपेक्षा आहे. केवळ शाळेमध्येच नव्हे तर सरकारी कचे-यातील अ-मराठी कर्मचा-यांना व अधिका-यांना मराठी भाषा शिकण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. अ-मराठी विद्यार्थी मराठी भाषेचा जो अभ्यास करणार आहेत तो प्रादेशिक

भाषा म्हणून, दुय्यम भाषा म्हणून. साहजिकच ही जबाबदारी मराठी शिक्षकांवर आलेली आहे. या दृष्टीने दुय्यम भाषा म्हणूनही मराठीच्या अध्यापनाचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

इ.स. १९७२ पासून भाषेच्या अभ्यासक्रमात मराठी विविध स्तरावर शिकविण्याची सोय झाली आहे. प्रथम भाषा, द्वितिय भाषा व तृतीय भाषा म्हणून मराठी भाषेचा अभ्यास माध्यमिक शाळांतून होत आहे. म्हणून विविध स्तरावर भाषेचा अभ्यास करताना कोणती उद्दिष्टे आहेत याचा विचार करणे अगत्याचे ठरते.

२.३] <u>मराठीच्या अध्ययन/अध्यापनाची उद्दिष्टे</u> :-

२.३.अ] <u>प्रथम स्तरावरील मराठी भाषेच्या अध्ययन/अध्यापनाची उद्दिष्टे</u> -

भाषेचे मानवी जीवनातील महत्व, मातृभाषेची महती, तिच्या अध्ययन-अध्यापनाची गरज इ.चा विचार केल्यानंतर मातृभाषेच्या अध्ययन-अध्यापनाच्या उद्दिष्टांचा विचार करणे योग्य ठरते.

अध्यापन ही एक विकासात्मक प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांच्या विविध मन:शक्तीचा व मन:प्रवृत्तीचा विकास घडवून आणणे हे शिक्षणाचे व म्हणूनच अध्यापनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आपल्या मनातील विचार स्पष्ट, नि:संदिग्ध शब्दात मांडता येणे हे भाषेचे कार्य. विचार करावयास शिकविणे, विचारशक्तीची वाढ होण्यास सहाय्य करणे हा भाषा-शिक्षणाचा प्रधान हेतू आहे.

मराठीच्या अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या कोणकोणत्या मानसिक शक्तींचा, वृत्ती-प्रवृत्तींचा व कौशल्यांचा विकास होऊ शकतो, होणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊनच मराठी अध्ययन-अध्यापनाची उद्दिष्टे निश्चित करावी लागतात. त्यादृष्टीकोनातून उद्दिष्टांचे ढोबळ मानाने वर्गीकरण पुढील प्रमाणे केलेले आहे.

## मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे[3]

- भाषिक उद्दिष्टे
  - ग्रहणात्मक उद्दिष्टे
    - श्रवण
    - वाचन
  - प्रगटीकरणात्मक उद्दिष्टे
    - भाषण
    - लेखन
- वाङ्‌मयीन उद्दिष्टे
  - रसग्रहणात्मक उद्दिष्टे
  - सृजनात्मक उद्दिष्टे

### भाषिक उद्दिष्टे -

भाषेची प्रमुख कार्ये दोन - [१] भाषा समजणे व [२] भाषेचा वापर करता येणे. यांनाच अनुक्रमे भाषा ग्रहणशक्ती व भाषा प्रगटीकरण शक्ती असेही म्हणता येईल. भाषा ग्रहणशक्तीमध्ये प्रामुख्याने ऐकलेली भाषा समजणे म्हणजे 'श्रवण' व लिहिलेली भाषा समजणे म्हणजे 'वाचन' या दोन मूलभूत कौशल्यांचा समावेश होतो. अशा रीतीने दैनंदिन जीवनात, व्यवहारात इतरांचे अनुभव व विचारभावना ग्रहण करण्यास त्याचप्रमाणे हरत-हेच्या आत्मप्रगटीकरणास आवश्यक असलेले भाषिक सामर्थ्य प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये निर्माण करणे हे अध्यापनाचे प्रमुख कार्य आहे.

### ग्रहणात्मक उद्दिष्टे -

ग्रहणात्मक उद्दिष्टाचा अर्थ विद्यार्थ्यांच्या भाषा ग्रहणशक्तीचा विकास करणे. या उद्दिष्टाची प्रथम पायरी म्हणजे विद्यार्थ्यांना शब्दांचे अर्थ, त्यातील अर्थांच्या विविध छटा, संदर्भानुसार बदलणारे विविध अर्थ, शब्दांच्या मागील सांस्कृतिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी समजणे, यासोबतच वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते इ. अर्थज्ञान होणे महत्वाचे आहे. दुसरी पायरी म्हणजे लिहिणा-याच्या लिखाणातील किंवा बोलणा-याच्या भाषणातील मध्यवर्ती कल्पना, प्रमुख मुद्दा, इतर महत्वाचे मुद्दे-उपमुद्दे विद्यार्थ्यांना चटकन् समजून घेता आले पाहिजेत. इतकेच नव्हे तर लेखकाचा भावाशय, त्याचा दृष्टिकोन, त्यातील गर्भितार्थ व ध्वन्यर्थ सुध्दा विद्यार्थ्यांना समजला पाहिजे.

म्हणजेच भाषा ग्रहणशक्तीचा विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांची विचारशक्ती, कल्पनाशक्ती, बुध्दी इत्यादी शक्तींचा विकास होणे आवश्यक आहे. यासाठी विद्यार्थ्यांची श्रवणक्षमता व वाचनक्षमता वाढविली पाहिजे, या कौशल्यातील बारकावेही ग्रहण केले पाहिजेत.

<u>प्रगटीकरणात्मक उद्दिष्टे</u> -

आत्मप्रगटीकरण म्हणजे स्वत:चा विचार, स्वत:च्या भावना, कल्पना, मते, अनुभव, प्रतिक्रिया, दृष्टिकोन व्यक्त करणे. हे प्रगटीकरण दोन पातळीवर होते. [१] मौखिक, [२] लेखी. या दृष्टीने शुध्द भाषण व शुध्दलेखन ही पहिली पायरी. आपल्या भावना, कल्पना, मते, प्रतिक्रिया, थोडक्यात, मुद्देसूद, प्रभावी व परिणामकारकरितीने व्यक्त करता येणे ही या पुढची पायरी.

हे कौशल्य प्राप्त होण्यासाठी सुयोग्य शब्दांचा, वाक्प्रचारांचा, म्हणी, सुभाषितांचा, प्राप्त ज्ञानातील अनुरूप संदर्भांचा नेमका व यथोचित वापर करण्याची क्षमता निर्माण व्हावयास हवी. त्याचप्रमाणे वर्णनकौशल्य, निवेदन कौशल्य, कथन कौशल्य, स्पष्टीकरण-विवेचन कौशल्य निर्माण झाले पाहिजे. लेखनामध्ये हे कौशल्य वाक्यरचना, परिच्छेद लेखन, निबंध लेखन, सारांश लेखन, पत्रलेखन, प्रश्नोत्तर लेखन इत्यादी स्वरूपात निर्माण झाले पाहिजे. मौखिक पातळीवर ही क्षमता अनुक्रमे संभाषण, कथन, निवेदन, चर्चा, वादविवाद, भाषण इत्यादी माध्यमातून विकसित होऊ शकते. अशा रीतीने भाषेचा समर्थपणे, आत्मविश्वासाने उपयोग करण्याचे सामर्थ्य निर्माण करणे म्हणजेच प्रगटीकरणात्मक उद्दिष्ट साध्य करणे होय.

वरील सर्व भाषिक उद्दिष्टांना प्राथमिक व पूर्वमाध्यमिक म्हणजे साधारणत: पहिली ७ वर्षे प्राधान्य द्यावे व त्यानुसार मराठीचे अध्यापन करण्यात यावे कारण ही भाषिक उद्दिष्टे पायाभूत अशी आहेत. या उद्दिष्टांच्या साध्यतेवर पुढील वाङ्मयीन उद्दिष्टांची साध्यता अवलंबून असते.

वाड्.मयीन उद्दिष्टे -

मराठीच्या अध्यापनात भाषिक घटकासोबतच वाड्.मयीन उद्दिष्टांचा विचार करताना वाड्.मयनिर्मितीची प्रक्रिया, प्रयोजन, व वाड्.मयाचा वाचकांच्या मनावर होणारा परिणाम या गोष्टी आधारभूत मानाव्या लागतात. रस, सौन्दर्य, अनुभूती व कलात्मक ही वाड्.मयीन कलाकृतीची मूलतत्वे आहेत, तिचा गाभा आहे. जेव्हा रसिक वाचक ही कलाकृती वाचतो तेव्हा तिचा आस्वाद घ्यावा या मूलतत्वांचा त्याच्या मनावर सूक्ष्म परिणाम व्हावा ही अपेक्षा असते. या दृष्टीने या उद्दिष्टांचे दोन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

रसग्रहणात्मक किंवा सौन्दर्यानुभूतीपर उद्दिष्टे -

वाड्.मयीन कलात्मक आनंद प्राप्त होण्यासाठी लागणारी विशिष्ट प्रकारची मानसिक पात्रता निर्माण करणे हा वाड्.मय अध्यापनाचा खरा हेतू. वाड्.मयाचा आस्वाद घेण्याची म्हणजेच रसास्वादाची किंवा सौन्दर्यानुभूतीची पात्रता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यासाठी त्यांच्या विचारशक्तीचा व कल्पनाशक्तीचा विकास व्हावयास पाहिजे एवढेच नव्हे तर संवेदनक्षमता, सौन्दर्यदृष्टी, सहृदयता, सद्‌भिरुची, रसिकता या मन:प्रवृत्तींचा व शक्तीचा विकास झाला पाहिजे. यासाठी वाड्.मयाच्या अध्यापकाला तो शिकवित आलेल्या विविध वाड्.मयकलाकृतींच्या अध्यापनातून तऱ्हतऱ्हेच्या मानवी भावनांशी व पात्रांशी विद्यार्थ्यांना समरस करवून त्यांना गूढतेचा व सखोलतेचा प्रत्यय आणून द्यावा लागेल व तदंतर्गत श्रेष्ठ मानवी आणि कलात्मक मूल्यांचे संस्कार जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांच्या मनावर करावे लागतील.

मराठी भाषा, तिच्यातील साहित्य, साहित्यिक यांच्याविषयी आदर व अभिमान उत्पन्न करणे, साहित्याद्वारे संस्कृतीचा परिचय घडवून देणे व सांस्कृतिक मूल्यांचे संस्कार करणे याही उद्दिष्टांना याच सदरात महत्वाचे स्थान दिले पाहिजे.

सृजनात्मक उद्दिष्टे -

मराठीच्या अध्यापनाची अत्युच्च पातळीवरील उद्दिष्टे म्हणजे सृजनात्मक म्हणजे नवनिर्मिती, कलात्मक अभिव्यक्ती, क्रियाशीलतेचा स्वतंत्र व मौलिक स्वरूपाचा अविष्कार होय. सुंदर, स्वतंत्र, मौलिक व शैलीदार लिखाण करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, भाषा सौन्दर्यप्रसाधनांच्या विविध अंगांची सुंदर शब्दयोजना, अलंकार, सुभाषिते, वचने, मांडणी, शैली इत्यादींची जाणीव देऊन त्यांचे प्रत्यक्ष उपयोजन करावयास लावणे व तद्द्वारा आत्माविष्काराचे एक कलात्मक माध्यम त्यांना प्राप्त करून देणे हे सृजनात्मक उद्दिष्टांचे खरे रूप. प्रगटीकरणाची उच्च व कलात्मक पातळी म्हणजे सृजनशीलता. रसानुभूती, सौन्दर्यानुभूती ही वाङ्मयीन उद्दिष्टांची आस्वादात्मक बाजू, तर सृजनशीलता ही निर्मायक बाजू.

उद्दिष्टांबाबत वरील वर्णन केलेली सर्व उद्दिष्टे प्रथम भाषा मराठीच्या अध्यापनाची आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत असणाऱ्या मराठी भाषेचे अध्ययन-अध्यापन द्वितीय स्तरावर केले जाते. प्रस्तुत संशोधनात या संबंधीचा विचार असल्याने द्वितीय स्तरावरील मराठीच्या अध्ययन-अध्यापनाच्या उद्दिष्टांचा विचार करणे येथे आवश्यक ठरते.

२.३.ब] द्वितीय स्तरावरील मराठीच्या अध्ययन-अध्यापनाची उद्दिष्टे -

मातृभाषा - प्रथमभाषा मराठीच्या अध्यापनाच्या उद्दिष्टांचे विवेचन करत असताना भाषिक उद्दिष्टे व वाङ्मयीन उद्दिष्टे असे दोन प्रकारात वर्गीकरण केले होते. दुय्यम स्वरूपात जेव्हा एखाद्या भाषेचे अध्यापन केले जाते तेव्हा वाङ्मयीन उद्दिष्टांचा विचार करण्याची आवश्यकताच नसते, भाषिक उद्दिष्टांचीच मर्यादा घालून घ्यावी लागते. कारण प्रादेशिक भाषा शिकण्याची आवश्यकता प्रामुख्याने व्यावहारिक असते. सामाजिक जीवनात मराठी भाषेच्या माध्यमातून व्यवहार करता यावा. प्रादेशिक

लोकांशी संबंध प्रस्थापित करून सामाजिक जीवन सुकरतेने जगता यावे हा मराठी शिकण्याचा हेतू. भाषा समजणे व भाषा बोलता येणे व थोडेफार शुध्द स्वरूपात लिहिता येणे ही अ-मराठी विद्यार्थ्यांसाठी मराठीच्या अध्यापनाची सारांशरूपाने उद्दिष्टे होत.

महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमाच्या शाळांत दुय्यम स्तरावरील मराठी भाषेचा अभ्यास इयत्ता ५ वी पासून सुरू होतो. साधारणपणे मातृभाषा अध्यापनांची इयत्ता १ ते ४ पर्यन्त जी उद्दिष्टे आहेत तीच उद्दिष्टे अ-मराठी विद्यार्थ्यांसाठी ५, ६, ७ इयत्तामध्ये ठेवता येतील. तसेच मातृभाषा अध्यापनाची पुढे ५, ६, ७ या इयत्तांसाठी जी उद्दिष्टे आहेत ती अ-मराठी विद्यार्थ्यांना ८, ९, १० या इयत्तांसाठी लागू करावीत.

सारांशरूपाने असे म्हणता येईल की, विद्यार्थ्यांना मराठी भाषेत लिहिलेला वा बोललेला आशय चटकन समजणे, सोप्या परंतु शुध्द मराठीत बोलता येणे, आपले विचार, मुद्दे, कल्पना मराठीत थोडक्यात मांडता येणे. व्यावहारिक दृष्टीने आवश्यक असलेले लेखन करता येणे, मराठीतून इतरांबरोबर संभाषण, चर्चा वगैरे करता येणे, बाजारहाटात, सामाजिक व्यवहारात, व प्रशासकीय कारभारात मराठी भाषेचा वापर करता यावा, मराठीच्या रचना वैशिष्टयावर प्रभुत्व प्राप्त व्हावे, मराठी वातावरणाशी व मराठी लोकांच्या जीवनाशी समरस होता यावे, मराठी संस्कृती व साहित्य यांचा स्थूल परिचय होऊन तत्संबंधी जिव्हाळा व आदर निर्माण व्हावा. अशा अ-मराठी विद्यार्थ्यांबाबत मराठीच्या अध्यापनाकडून अपेक्षा आहेत. द्वितीय व तृतीय भाषा म्हणून अध्ययन-अध्यापन करण्याची उद्दिष्टे अभ्यासक्रमात पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

I] विद्यार्थ्यांच्या अनुभवाच्या कक्षेतील विषयावर आधारित असलेल्या लेखी व बोली मराठी भाषेची धाटणी समजण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे.

II] जीवनातील नेहमीच्या प्रसंगी आवश्यक असे संभाषण व लेखन अचूकपणे व स्पष्टपणे करण्याची कुवत विद्यार्थ्यांत निर्माण होण्यास मदत करणे.

III] मराठी भाषेची मूलभूत रचना आणि तिची वैशिष्टये यांची सर्वसामान्य समज निर्माण होण्यास मदत करणे.

IV] विद्यार्थ्यांच्या आवाक्यातील मराठी वाङ्.मयाबद्दल अभिरूची निर्माण होण्यास मदत करणे.

V] मराठी भाषेद्वारा महाराष्ट्राचे जीवन आणि संस्कृती यांचा परिचय होण्यास मदत करणे.

VI] एकूण समाजाशी असलेल्या आपल्या एकात्मतेची जाणीव विद्यार्थ्यांत निर्माण होण्यास मदत करणे.

शिक्षणक्षेत्रात आलेल्या मूल्यमापनाच्या नव्या दृष्टीकोनानुसार अध्यापन प्रक्रियेत व्यक्तीमत्वाच्या सर्व अंगाच्या विकासाला वाव मिळू शकेल अशा पध्दतीने उद्दिष्टांची पुनर्मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. तो पुढील प्रमाणे आहे.

१] ज्ञान-आकलन

२] उपयोजन

३] कौशल्य

४] रसग्रहण

५] अभिरूची व अभिवृत्ती

६] सृजनशीलता

हा नवा दृष्टीकोन आपण वर प्रतिपादिलेल्या उद्दिष्टापासून मूलत: वेगळा नाही, उलट ती उद्दिष्टे समांतर, सुसंगत व पूरकच आहेत. यांच्या परिभाषेत थोडा फरक असला तरी ही उद्दिष्टे वरील सर्व उद्दिष्टामध्ये अंतर्भूत झालेली आहेत.

उद्दिष्टांची स्पष्टीकरणे देणे आवश्यक आहे. उद्दिष्टांचे स्पष्टीकरण म्हणजे प्रत्येक उद्दिष्टांतर्गत अपेक्षित असलेल्या वर्तन-परिवर्तनाची मांडणी होय. उद्दिष्टे व स्पष्टीकरणे नीट समजली की विद्यार्थ्यांच्या कोणत्या प्रवृत्तींचा

विकास करावयाचा आहे, कोणत्या वर्तनात परिवर्तन करावयाचे आहे याचे शिक्षकांना स्पष्ट ज्ञान होते व त्यादृष्टीने अध्यापनाची दिशा ठरविता येते.

२.४] <u>मराठी भाषेचा अध्यापक</u> –

शाळेमध्ये अनेकविध विषयांचे अध्यापन चालू असते. अध्यापन ही एक कला आहे असे म्हटले तर अध्यापक हा कलावंत आहे असे म्हणणे योग्यच ठरेल. या दृष्टीने प्रत्येक अध्यापक मग तो कोणत्याही विषयाचा असो तो कलावंत आहे. मात्र भाषेच्या अध्यापकाला ही संज्ञा यथार्थपणे लागू पडते कारण भाषेच्या विशेषत: मराठीच्या शिक्षकाचे स्थान इतरांपेक्षा थोडे आगळे-वेगळे आहे. भाषेच्या अध्यापकाला भाषेतील साहित्य शिकवावे लागते. साहित्य ही तर श्रेष्ठ कला आहे. ती निर्माण करणारा साहित्यिक कलावंत असतो अशा कलावंताच्या साहित्यकृतीचा आस्वाद विद्यार्थ्यांपर्यन्त पोहचविण्याचे काम भाषेचा अध्यापक करतो म्हणून त्यास प्रतिकलावंतच म्हटले पाहिजे. नाटककार नाटक लिहितो, नट नाटयांतर्गत आशय रंगभूमीवर अभिनीत करून दाखवतो म्हणून आपण नाटककार आणि नट दोघांनाही कलावंतच मानतो. अशाच प्रकारची भूमिका शिक्षकाला वठवावी लागते. त्यातील सौन्दर्याचे दर्शन विद्यार्थ्यांना घडवावे लागते. काव्यगायन करावे लागते. नाटयीकरणाद्वारे रसाविष्कार करावा लागतो, शैलीदार भाषेमध्ये विद्यार्थ्यांच्या भावनांना अवाहन करावे लागते. यादृष्टीने भाषाशिक्षकास कलावंत म्हटले पाहिजे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठीच्या अध्यापकाला मराठीचे अध्यापन अतिशय कुशलतेने, सोप्या व सुलभ भाषेत विद्यार्थ्यांना समजेल अशा मनोरंजक पध्दतीने करावे लागते. ही सुध्दा एक कलाच आहे. शिक्षक कितीही विद्वान, हुशार असला तरी विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार त्यांच्या पातळीवर येऊन कलात्मक रितीने द्वितीय भाषा मराठीचे अध्यापन करावे लागते. मातृभाषेच्या अध्यापकापेक्षा द्वितीय भाषा मराठीच्या अध्यापकाची भूमिका या अर्थाने वेगळी आहे. म्हणून हा ही शिक्षक कलावंत असावा. अगदी पट्टीचा कलावंत

नसेलही परंतु वरील अनेकविध गुण त्याच्याठिकाणी कमीअधिक प्रमाणात असले पाहिजेत. मग तो कोणत्याही माध्यमाच्या शाळेतील अगर कोणत्याही स्तरावर मराठीचे अध्यापन करणारा असेल.

शिक्षक कसा असावा यासंबंधी विचार करू लागलो म्हणजे अनेक गुणांची यादी लक्षात येते. अभ्यासूवृत्ती, व्यासंग, आपल्या विषयावर प्रभुत्व, विषयाचे अद्यावत ज्ञान, उत्तम प्रतिपादन शैली, अध्यापन कलेत नैपुण्य, विविध पध्दतींशी परिचय, प्रयोगशीलता, प्रसन्न व प्रभावी व्यक्तीमत्व, विद्यार्थ्यां-विषयी प्रेम व जिव्हाळा, त्यांच्या विकासाची तळमळ, विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्राचा अभ्यास, शिक्षक व्यवसायावर निष्ठा, अशा कितीतरी गुणांचा निर्देश करता येईल. हे गुण कोणत्याही शिक्षकांच्या अंगी असणे आवश्यक आहे. परंतु भाषेचा शिक्षक या नात्याने अन्य विषयांच्या शिक्षकापेक्षा विशेषप्रकारच्या गुणांची, कौशल्यांची, प्रवृत्तींची व अभिवृत्तींची त्यांच्याठायी आवश्यकता आहे. प्रत्येक शिक्षकाच्या अंगी आवश्यक असलेल्या कांही मूलभूत गुणांचे अस्तित्व गृहित धरून त्या व्यतिरिक्त भाषेच्या शिक्षकाकडे इतर कोणते गुण असावेत याचा पुढील परिच्छेदामध्ये थोडक्यात परामर्श घेतला आहे.

<u>शैक्षणिक पात्रता</u> -

मराठीचा शिक्षक पदवी परीक्षेला मराठी हा प्रमुख विषय घेऊन चांगल्या गुणांनी किंवा श्रेणींनी उत्तीर्ण झालेला असावा. तो जर पदव्युत्तर परीक्षेला मराठी प्रमुख विषय घेऊन चांगल्या गुणवत्तेने किंवा श्रेणीने उत्तीर्ण झालेला असेल तर फारच चांगले, त्याप्रमाणे अध्यापन पदवीला एक अध्यापन-पध्दती "मराठी" घेतलेली असावी.

<u>विषयाची आवड</u> -

मराठी विषयाच्या शिक्षकाचा भाषा विषयाकडे नैसर्गिक कल असावा व त्याची त्याला खास आवडही असावी. विषयाची आवड असणारा शिक्षक तो विषय अत्यंत तन्मयतेने शिकवितो व त्या विषयाचे वाचन, मनन, चिंतन, पाठांतर आनंदाने आणि अभ्यासूवृत्तीने करतो व परिणामकारक अध्यापनाने

विद्यार्थ्यांवर अनुकुल संस्कार होतो. केवळ पदवीला अगर पदव्युत्तर परीक्षेस मराठी विषय घेऊन चालणार नाही, तर त्याचबरोबर त्या विषयाची खरीखुरी आवड असली पाहिजे.

व्यासंग -

"पेशा शिक्षकाचा पण वृत्ती विद्यार्थ्याची" हेच ख-या शिक्षकाचे ब्रीद होय.[४] मराठी विषयशिक्षकास वाङ्‌मयाचा, साहित्याचा उत्तम परिचय असला पाहिजे. यासाठी त्याने सतत वाचन ठेवून त्यात ताजेपणा, अद्यावतपणा राखला पाहिजे. साहित्याचे सूक्ष्म ज्ञान, त्यातील प्रवाह, विविध कालखंडातील बदलते स्वरूप, साहित्यिकांचा परिचय, नवोदित साहित्य इत्यादींचे ज्ञान असले पाहिजे. या सर्वांसाठी व्यासंग गाढा असावा लागतो.

भाषेच्या शिक्षकाला टीकाकार, भाष्यकार या बरोबरच 'दुभाष्याची' भूमिकाही पार पाडावी लागते. या अकोलकरांच्या मताशी सर्वजण सहमत होतील. ज्या अनुभूतीमुळे लेखक लेखनास प्रवृत्त झाला असेल ती अनुभूती विद्यार्थ्यांच्या अनुभवकक्षेत आणण्याचे बिकट काम शिक्षकांना करावे लागते. त्यासाठी विस्तृत व्यासंग असला पाहिजे. चौफेर वाचन असले पाहिजे. काय वाचावे व काय वाचू नये याबाबतीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता आले पाहिजे. अध्यापन करताना संदर्भ देता आले पाहिजेत. व्यासंगी शिक्षकच विद्यार्थ्यांना ज्ञानसमृध्द करू शकतो आणि वाचनाची आवड निर्माण करू शकतो. म्हणून भाषा शिक्षकांनी आपला व्यासंग वाढविला पाहिजे.

भाषेबद्दल सार्थ अभिमान -

मराठी विषयाचा शिक्षक भाषेचा उपासक असला पाहिजे. भाषेचे अध्यापन हे पवित्र कार्य मानले पाहिजे. भाषेबद्दल ज्वलंत अभिमान असला पाहिजे. आपल्या साहित्यिक वारसाबद्दल प्रेम व जिव्हाळा असला पाहिजे.

उच्चारशुध्दता व लेखनशुध्दता -

मराठी विषयाच्या शिक्षकाचे किंबहुना सर्वच शिक्षकांचे उच्चार व लेखन

शुध्द व स्पष्ट असावे. तज्ज्ञांनी, भाषा शास्त्रज्ञांनी, शिक्षणशास्त्रज्ञांनी मान्य केलेल्या अधिकृत स्वरूपात स्वीकृत केलेल्या नियमांचे अध्ययन - अध्यापनात पालन केले पाहिजे. उच्चारात व लेखनात कोणत्याही प्रकारच्या चुका होणार नाहीत याची काळजीपूर्वक खबरदारी घेतली पाहिजे. शुध्दतेबाबत शिक्षक जागरूक असेल तर विद्यार्थी त्यांचेच अनुकरण करेल. वाणीची शुध्दता अत्यंत महत्वाची, जसे बोलले जाते तसेच लिहिले जाते. म्हणून भाषा शिक्षकावर मोठी जबाबदारी असते, कोणत्याही शब्द उच्चारताना वा लिहिताना तो विचारपूर्वक व अचूकच असला पाहिजे व असे शुध्दतेचे संस्कार विद्यार्थ्यांवर बालवयापासून केले पाहिजेत.

भाषाप्रभुत्व व वक्तृत्व -

भाषाशिक्षकाकडे भाषाप्रभुत्व असणे हे तर्कसंगतच आहे. भाषाप्रभुत्व कष्टसाध्य आहे, असाध्य निश्चितच नाही. प्रसंगानुरूप भाषेचा समर्थपणे वापर करण्याची क्षमता, योग्य व चपलख शब्दरचना, मुद्देसुद मांडणी, शुध्दता, स्पष्टता प्रवाहीपणा, ओघवतेपणा या सर्वांचा भाषाप्रभुत्वामध्ये समावेश होतो. ज्यांच्याकडे भाषाप्रभुत्व असते त्यांना कोणतीच अडचण येत नाही. इतर विषयशिक्षक व भाषा शिक्षक यांच्यातील हे एक व्यवच्छेदक लक्षण आहे.

शाळेत विविध प्रकारचे बौध्दिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राष्ट्रीय कार्यक्रम होत असतात. त्यावेळी व्याख्याने देणे, परिचय करून देणे, प्रास्ताविक करणे, आभार मानणे, संयोजन करणे यासारख्या प्रसंगी भाषा शिक्षकाकडे जबाबदारी येते. अशावेळी योग्य विचार वा मुद्दा भाषेच्या कोंदणात चपखलपणे बसवून त्यावर सौन्दर्याचा साज चढवून, सुव्यवस्थितपणे व आकर्षक मांडता आला पाहिजे यासाठी भाषाशिक्षकाकडे वक्तृत्व हा गुण असणे आवश्यक ठरते. म्हणून भाषाशिक्षक हा भाषेचा भक्त व भाषा प्रभू, वक्तृत्वगुणसंपन्न असला पाहिजे.

अध्यापन तंत्राचे ज्ञान -

अध्यापन ही कला आहे आणि इतर कलाप्रमाणे तिच्यामागे काही शास्त्रीय नियम आहेत. याचे ज्ञान मराठीच्या अध्यापनाच्या संदर्भात मराठी

अध्यापकाकडे हवे. मराठीच्या आशयाचे गद्य, पद्य, व्याकरण व लेखन असे वर्गीकरण करण्यात येते. प्रत्येकाचे अध्यापनाचे तंत्र स्वतंत्र आहे. त्यासाठी विविध पध्दती अध्यापनासाठी वापराव्या लागतात. या तंत्राचे व पध्दतींचे ज्ञान असणे अत्यावश्यक आहे. यामध्ये परिस्थितीप्रमाणे, आशया प्रमाणे, विद्यार्थ्यांप्रमाणे, नियोजनाप्रमाणे योग्य बदल करण्याइतके ज्ञान असले पाहिजे. त्यात लवचिकता असली पाहिजे. शिक्षणक्षेत्रात येणा-या नवनवीन तंत्राचा वापर जाणून घेतला पाहिजे व त्याचा अवलंब केला पाहिजे. हा ज्ञानाचा, तंत्राचा अद्यावतपणा शिक्षकाच्या ठिकाणी असेल तर मराठीचे अध्यापन कौशल्यपूर्ण, योजनापूर्ण व कल्पकतापूर्ण होऊन परिणामकारक व प्रभावी होईल. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाचे अध्यापन करण्याचे विशिष्ट तंत्र शिक्षकाने ज्ञात करून घ्यावे.

<u>भाषाभगिनींशी परिचय</u> -

मराठीच्या शिक्षकाचा इतर भाषांशी परिचय असणे अगत्याचे आहे. विशेषत: संस्कृत, संस्कृतोद्भव भाषा, इंग्रजी, हिंदी, आदी भाषांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. याशिवाय इतर भाषाभगिनींशी परिचय झाला तर उत्तमच भाषाशिक्षक बहुभाषी असावा. इतर भाषेतील उत्तम साहित्याचा परिचय करून घेतला पाहिजे.

<u>संपन्न व्यक्तिमत्व</u> -

शिक्षणप्रक्रियेत शिक्षक हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. शिक्षणविषयक कार्यांचे आयोजन करताना उद्दिष्टे, अभ्यासक्रम, पध्दती इत्यादी घटकांचा विचार करावा लागतो परंतु या सर्व घटकांच्या अंमलबजावणीचे कार्य शेवटी शिक्षकालाच करावे लागते. अभ्यासक्रम व पध्दती म्हणजे केवळ निष्क्रिय सांगाडा! त्यात प्राण ओतण्याचे काम शिक्षकाचे. शिक्षकाचा दर्जा, त्याची निष्ठा, त्याची प्रामाणिक तळमळ, त्याची योजकता, कार्यकुशलता व उपयोजनक्षमता, एकूण त्याचे व्यक्तिमत्व हाच शिक्षणप्रक्रियेचा कणा होय म्हणून शिक्षकाचे स्थान व त्याचे महत्व अद्वितीय, अनन्यसाधारण आहे. शिक्षकाचे आचार-विचार यांची छाप विद्यार्थ्यांवर पडते.

भाषेचा शिक्षक हा साहित्याचा शिक्षक असतो. तो रसिक व सहृदय असावा लागतो. त्याच्याकडे रसास्वादनक्षमता असावी लागते. संपन्न व्यक्तिमत्वाचा विशेष पैलू म्हणजे अध्यापकाचा जीवनविषयक दृष्टिकोन. हा दृष्टिकोन विशाल असावा. चिंतनशील व स्वागतशील असावा लागतो. त्याची वृत्ती प्रयोगशील असावी. गद्य, पद्य, व्याकरण, लेखन याबाबतीत विविध अध्यापन पध्दतींचे नवनवीन प्रयोग करून त्यातील सरस व योग्य कोणत्या हे ठरविले पाहिजे. भाषेचे दर्जेदार अध्यापन करून एक संस्कारक्षम व साहित्यभिरूची भाषाभिमान असलेली नवीन पिढी निर्माण करण्याचे सामर्थ्य शिक्षकाच्या व्यक्तिमत्वामध्ये असले पाहिजे.

शिक्षकाचे व्यक्तिमत्व अनुकरणशील असले पाहिजे. खरा शिक्षक हा जन्मावा लागतो असे म्हटले तरी तो घडविला जाऊ शकतो हे निश्चीत. अध्यापन ही कला आहे ती कष्टसाध्य असली तरी असाध्य मात्र निश्चितच नाही. प्रभावी व्यक्तिमत्व जोपासण्याची जिद्द व इच्छा असेल व तसा प्रामाणिकपणे प्रयत्न केला तर शिक्षक व्यक्तिमत्वसंपन्न बनेल.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठीच्या अध्यापकाला इंग्रजी भाषेचेही ज्ञान असले पाहिजे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत केरळ, मध्यप्रदेश, तामिळनाडू या ठिकाणचेही विद्यार्थी असतात. त्यांना आपल्या मराठी भाषेच्या वातावरणात सामावून घेऊन, त्यांना समजून घ्यावे लागते. समायोजनाचा हा गुणही अध्यापकामध्ये असला पाहिजे.

वरीलप्रमाणे मराठीच्या अध्यापकाने गुणसंग्रह केल्यास आदर्श शिक्षक या संज्ञेस पात्र होईल.

## २.५] मराठी विषयाच्या अध्यापन पध्दती -

मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे, मराठीचा अध्यापक यांचा विचार केल्यानंतर स्वाभाविकपणे प्रत्यक्ष अध्यापनाचा विचार करणे क्रमप्राप्त होते. मराठीच्या विषयामध्ये गद्य, पद्य, व्याकरण व लेखन असे वर्गीकरण केले जाते.

या सर्वांसाठी एकच एक अध्यापन पध्दती उपयुक्त ठरत नाही. यासाठी मराठी अध्यापनाच्या विविध पध्दती कोणत्या ? त्यातील फलदायी कोणत्या ? याचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

उद्गामी - अवगामी पध्दती -

या पध्दतीचा उपयोग विशेषत: व्याकरण अध्यापनासाठी करतात. उद्गामी म्हणजे वर जाणारी म्हणजे विशेषाकडून सर्वसामान्य नियमाकडे जाणारी पध्दती. प्रत्यक्ष अशा वस्तू, उदाहरणे, विचार-आचार यांच्या परिक्षण-निरीक्षणावरून तत्व शोधून काढण्याची, सिध्दांत शोधून काढण्याची जी पध्दती आहे ती उद्गामी पध्दती होय. ही पध्दती उदाहरणे, त्यांचे पृथक्करण, वर्गीकरण, नियमन, सामान्यीकरण, उपयोजन या क्रमाने, प्रक्रियेने पूर्ण होते. विशिष्ठाकडून सामान्याकडे या सूत्रावर ही पध्दती आधारलेली असते.

अवगामी पध्दती म्हणजे सामान्याकडून विशेषाकडे, सिध्दांताकडून उदाहरणाकडे वरून खाली येणारी अशी पध्दती. ही पध्दती केवळ वापरली तर विद्यार्थी निष्क्रिय बनतात म्हणून उद्गामी पध्दतीनुसार सिध्दांतापर्यन्त येणे व अवगामी पध्दतीनुसार उपयोजन करणे असे जर दोन्ही पध्दती एकत्रीत वापरल्या तर व्याकरणाचे अध्यापन सुकर व परिणामकारक होते. उद्गामी पध्दतीत असलेला उपयोजनाचा अभाव व अवगामी पध्दतीतील क्रियाशीलतेचा अभाव दूर करून दोन्ही पध्दती एकत्र उद्गामी-अवगामी पध्दती वापरली तर व्याकरणासारख्या क्लिष्ट विषयाचे विद्यार्थ्यांना चांगले आकलन होते व त्या विषयी अभिरूची निर्माण होते. म्हणून शिक्षकांनी व्याकरण अध्यापनासाठी या पध्दतीचा वापर जरूर करावा.

कथन पध्दती -

कथन म्हणजे सांगणे, माहिती सांगणे, एखाद्या घटनेचे, प्रसंगाचे वर्णन, वस्तूचे वा व्यक्तीचे शाब्दिक वर्णन म्हणजेच एखाद्या विषयभागाचे तोंडी विवेचन, प्रतिपादन करणे म्हणजे कथन होय. 'कथन' व 'व्याख्यान' हे दोन्ही शब्द

एकाच अर्थाने वापरतात. परंतु शब्दात साम्य असले तरी ते एकरूप नाहीत. कथन हे अध्यापनास आवश्यक असे कौशल्य आहे. भाषा व इतिहास या विषयास तर कथन पध्दतीचाच अधिक उपयोग केला जातो. कथनामध्ये ओघ व एकसंघपणा आवश्यक असतो. कथन हे स्पष्टीकरण व व्याख्यान यांना पूरक व पोषक ठरते. मात्र ही पध्दती शिक्षक केन्द्रित पध्दत आहे. विद्यार्थी निष्क्रिय बनतात जर, या कथन कौशल्याचे मर्म चांगले समजले असेल तर शिक्षकाचे अध्यापन प्रभावी होते.

<u>व्याख्यान पध्दती</u> -

व्याख्यान पध्दती वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रामुख्याने वापरली जाते. कारण एकाच वेळी श्रवण करणे व टिपणे काढणे या दोन्ही क्रिया करणे लहान वर्गातील मुलांना जमत नाहीत. त्यांच्यामध्ये तेवढी परिपक्वता व शारीरिक क्षमता आलेली नसते. यामध्ये शिक्षक बोलतो व विद्यार्थी ऐकतो. त्यामुळे विद्यार्थी निष्क्रिय बनतो. व्याख्यान म्हणजे स्पष्टीकरण, विवेचन किंवा समजावून सांगणे. व्याख्यानाचे स्वरूप तात्त्विक असते. या पध्दतीद्वारे तौलनिक माहिती देता येते. संबोधाचे स्पष्टीकरण करता येते. स्पष्टीकरणासाठी शैक्षणिक साहित्याचा वापर, फलकाचा वापर, उदाहरणे, दाखले यांचा वापर करता येतो. यामुळे घटकासंबंधी परिपूर्ण माहिती थोडया वेळात देता येते. फार मोठया समूहासाठी उपयुक्त ठरते. पाठयपुस्तकाशिवाय अवांतर माहिती देता येते.

ही पध्दती शिक्षककेन्द्रित आहे. विद्यार्थी जास्तकाळ अवधान टिकवू शकत नाहीत. शिक्षकाकडून विषयांतर होण्याची शक्यता असते. प्रभावी व्याख्यानासाठी पूर्वनियोजन, विद्यार्थी स्तराचा विचार, शिक्षकाची अभ्यासपूर्ण नियोजनबध्द तयारी, अवधान टिकून ठेवण्याचे कौशल्य, मनोरंजकता, उदाहरणे दाखले, संदर्भ, शैक्षणिक साधनांचा योग्य ठिकाणी वापर आवश्यक असतो.

<u>परिसंवाद पध्दती</u> -

या पध्दतीमध्ये चार पाच विद्यार्थ्यांना विषयाचे मुद्यांमध्ये विभाजन

करून प्रत्येकी एक मुद्दा दिला जातो. त्याची तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ दिला जातो. पूर्वनियोजन व तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ दिला जातो. पूर्वनियोजन व तयारी चांगली असेल तर परिसंवाद यशस्वी होतो. या पध्दतीमुळे विद्यार्थी स्वत: विचार करणारा, स्वत:ची मते बनविणारा एक चांगला अभ्यासार्थी बनतो. त्याला चिकित्सक विचार करण्याची सवय लागते. सभाधीटपणा येतो. आत्मविश्वास वाढतो. परिसंवादासाठी ग्रंथालयाची जरुरी असते. विद्यार्थ्यांचा वाचन प्रक्रियेचा व श्रवणक्षमतेचा विकास या पध्दतीमुळे होतो.

<u>सांघिक अध्यापन पध्दती</u> -

या पध्दतीमध्ये अनेक शिक्षकांनी मिळून शिकविण्यास महत्व असते. शिक्षकांच्या विशिष्ट गुणांना वाव देणे, कौशल्यांना संधी देणे या कृतींना महत्व आहे. कोणा शिक्षकास चांगले गाता येते, कोणास विवेचन, स्पष्टीकरण चांगले जमते, कोणास प्रस्तावना उत्कृष्ट करता येते, कोणाचे फलकलेखन उत्तम असते. ज्याला जे, जे चांगले येते त्याची पूर्ण तयारी करून प्रत्येकाने एकमेकास मदत करून पाठ पूर्ण करावयाचा असतो. त्यामुळे पाठाचा परिणाम प्रभावी होतो.

याशिवाय नाटयीकरण पध्दती, समग्र पध्दती, रसग्रहण पध्दती यांचाही तद्नुषांगीक घटकानुसार अध्यापनासाठी वापर करता येतो.

द्वितीय स्तरावर मराठीचे अध्यापन करताना प्रत्यक्ष पध्दती, श्रवण-भाषण पध्दती, द्विभाषिक पध्दती, व्याकरण भाषांतर पध्दती इत्यादी पध्दतींचा वापर करता येतो. विशेषत: इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून मराठीचे अध्यापन करताना वरील पध्दतींचा वापर करावा.

वरीलपैकी कोणतीही एक पध्दती सर्वश्रेष्ठ नाही. विषय, वर्ग, विद्यार्थी स्तर, भाषेचा स्तर इत्यादीचा विचार करून योग्यवेळी योग्य त्या पध्दतीचा अवलंब करावा लागतो.

## २.६] मराठी विषयासाठी अभ्यासपूरक उपक्रम -

आज आपण एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत आहोत. शिक्षणाच्या संकल्पनेत क्रांतीकारक बदल झालेला आहे. शिक्षण म्हणजे चार भिंतीत चालणारे ठराविक अध्ययन-अध्यापन नव्हे तर शिक्षण म्हणजे ज्ञान, अनुभव, कौशल्ये व संस्कार होत. शिकविणारा शिक्षक कितीही उत्कृष्ट असला तरीही त्याच्या चाकोरीबध्द अध्यापनाला विद्यार्थी कंटाळतात. विद्यार्थ्यांना निसर्गत:च नाविन्याची हौस असते. अभ्यासपूरक कार्यक्रमांच्या माध्यमातून अध्ययन-अध्यापन अधिक परिणामकारक होते. नियोजित अभ्यासक्रम पाठ्यविषय, यांना अभ्यासपूरक उपक्रमांची जोड दिल्याशिवाय शिक्षणाची व्यापक उद्दिष्टे सफल होऊ शकत नाहीत.

### अभ्यासपूरक कार्यक्रमाची उद्दिष्टे -

१] विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडींचा व अनेकविध प्रवृत्तींचा विकास करणे.

२] विद्यार्थ्यांच्या भावनात्मक बाजूचा, नैतिक, सामाजिक व चारित्र्यविषयक बाजूंचा विकास करणे.

३] पाठ्यविषयामध्ये अभिरूची निर्माण करणे.

४] पाठ्यविषयांना अनुषंगिक अशा अभिवृत्तींचा विकास करणे.

५] विद्यार्थ्यांमध्ये धाडस, आत्मविश्वास, नेतृत्व, सहकार्यभावना, जबाबदारीची जाणीव या गुणांचा विकास करून त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक कार्य-क्षमतेचा विकास करणे.

### अभ्यासपूरक कार्यक्रमाची तत्वे -

अभ्यासपूरक कार्यक्रमाची उभारणी कांही निश्चित तत्वावरच झाली पाहिजे. नाही तर ते केवळ करमणूकीचे कार्यक्रम होतील व मर्यादित शालेय काळाचा अपव्यय होईल. ही तत्वे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१] अभ्यासपूरक कार्यक्रमांची सांगड अभ्यासक्रमाशी घातली गेली पाहिजे.

२] उपजत गुण शोधून काढण्याच्या हेतूने या कार्यक्रमांची उभारणी करण्यात यावी.

३] सर्व कार्यक्रम योजनापूर्वक आखले गेले पाहिजेत.

४] आपआपल्या आवडीप्रमाणे आणि पात्रतेप्रमाणे त्यात सहभागी होण्याची संधी प्रत्येक विद्यार्थ्यास मिळाली पाहिजे.

५] या कार्यक्रमाचे नेतृत्व भाषाशिक्षकाकडे असावे व त्यांनी इतर शिक्षकांचेही सहकार्य घ्यावे.

६] या कार्यक्रमास अभ्यासाचा जाच आणि परीक्षेची आच असू नये.

७] या कार्यक्रमांचा अतिरेक टाळावा.

मराठी विषयासंदर्भात अभ्यासपूरक उपक्रम -

१] हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, काव्यगायन स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, पाठांतर स्पर्धा, शुध्दलेखन स्पर्धा, वाचन स्पर्धा इत्यादी आयोजित करणे.

२] आकाशवाणीवरील शालेय कार्यक्रमांचे सामुदायिक श्रवण करणे व त्यावर विचारविनिमय, चर्चा करणे.

३] प्रसिध्द साहित्यिकांची जन्मतिथी व पुण्यतिथी साजऱ्या करणे.

४] साहित्यिकांचा परिचय करून देणे. मुलाखती घेणे इ.

५] सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे. उदा. नाटयछटा, नाटयप्रवेश, काव्यगायन इ.

६] चांगल्या पुस्तकांचे प्रदर्शन घडविणे.

७] वर्गवार सहली, क्षेत्रभेटींचे आयोजन करणे.

८] चर्चा, परिसंवाद आयोजित करणे.

९] साहित्य संमेलन, कवी संमेलन आयोजित करणे, त्यामध्ये सहभागी होणे.

१०] वृत्तपत्रे, मासिके यातील कात्रणे जमा करणे.

११] भित्तीपत्रके, हस्तलिखिते तयार करणे.

१२] संस्कृत, मराठी सुविचार, सुभाषिते पाठ करून घेणे, त्याचे फलकलेखन करणे.

१३] दिनविशेष सांगणे, थोरांच्या चरित्राचे वाचन करणे.

१४] एखादा भाषाविषयक प्रकल्प करणे. उदा. साने गुरुजी कथामाला..

13096
A

१५] सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा घेणे.

वरील उपक्रमांची यादी केवळ दिग्दर्शनात्मक आहे. या व्यतिरिक्त इतर उपक्रमही आयोजित करता येतील.

२.७] <u>समारोप</u> -

प्रस्तुत प्रकरणात शोधनिबंधास आवश्यक असलेली पार्श्वभूमी तयार करण्यासाठी पुरेशी सैध्दांतिक माहिती दिलेली आहे. या माहितीच्या पार्श्वभूमीवरच पुढील दोन प्रकरणामध्ये मराठी भाषेच्या अध्ययन व अध्यापन विषयक समस्यांच्या संदर्भात गोळा केलेल्या सामुग्रीचे वर्गीकरण, विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे.

—****—